# कृषि शिक्षणः सद्यस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता हमी व सुधारणा आणि रोजगार संधी

**डॉ. उत्तम चव्हाण, सेवानिवृत्त अधिष्ठाता (कृषि), श्री. आदिनाथ आंधळे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक आणि श्री. एकनाथ बांगर, सहाय्यक कुलसचिव, शिक्षण संचालनालय, मफुकृवि, राहुरी**

---

कृषि हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असुन देशाची अर्थव्यवस्था व विकासदर शेतीच्या उत्पादकतेवर अवलंबुन आहे. देशातील ६० % लोकसंख्येला कृषि क्षेत्र रोजगार उपलब्ध करून देते. कृषि व संलगन क्षेत्रातील विकसित कुशल मनुष्यबळ तंत्रज्ञानामुळे देशात हरितक्रांती झाली आणि आपण अन्नधान्य, दुध, तेलबिया, कडधान्ये, फळे यामध्ये स्वयंपुर्ण झालो. बदलत्या परिस्थितीत जागतिक बाजारपेठेत कृषि व कषि संलग्न व्यवसायांची उत्पादकता वाढविणे, कृषि उत्पादनांना स्थैर्य प्राप्त करून देणे व हवामान बदल व वाढती लोकसंख्या या समस्यांचा सामना करणेसाठी शाश्वत अन्नधान्य सुरक्षा स्थैर्यता प्राप्त करणेच्या दृष्टीने कृषि क्षेत्राला एक अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. कृषि उद्यानविद्या, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि अभियांत्रिकी, अन्न तंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, मत्स्यव्यवसाय, वनशास्त्र, पशुसंवर्धन या विषयातील प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे काळाचल गरज झाली आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली ही देशातील कृषि व संशाधन यांचे समन्वय करणारी शिखर संस्था आहे. आजमितीस, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतंर्गत एकुण ६४ राज्ये कृषि विद्यापीठे व ४ केंद्रिय विद्यापीठे कार्यरत आहेत. या सर्व विद्यापीठांमधून कृषि क्षेत्रासाठी लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार केले जाते. महाराष्ट्र राज्यात राहुरी, अकोला, दापोली आणि परभणी येथे चार कृषि विद्यापीठे स्थापन केलेली आहेत.

**पदवी अभ्यासक्रमः**

या अंतर्गत सध्या महाराष्ट्रात कृषि व कृषि संलग्न ४२ शासकीय व १५२ विनाअनुदान तत्वावर खाजगी क्षेत्रात महाविद्यालये सुरू करणेत आली आहेत. यांमधुन एकुण १६,६२६ विद्यार्थ्यांना कृषि व कृषि संलग्न अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येतो. त्यामुळे मोठया प्रमाणावर कृषि क्षेत्रामधील कुशल मनुष्यबळ निर्मिती होत आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चारही कृषि विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षात प्रवेशासाठी सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षापासून राज्य सामाईक प्रवेश प्रवेश परीक्षा (MHT-CET) अनिवार्य आहे. मात्र MHT-CET ऐवजी JEE/ NEET/ AIEEA-UG (भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणारी-All India Entrance Examination Test for Admision) या पैकी कोणतीही सामाईक प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्यात येईल. सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये (MHT-CET/ JEE/ NEET/ AIEEA-UG) प्राप्त झालेल्या गुणांच्या तसेच प्रचलित पध्दतीनुसार इतर अधिभार यांचे आधारावर प्रवेश देण्यात येतो.

**पदव्युत्तर अभ्यासक्रमः**

महाराष्ट्रातील चारही विद्यापीठामंध्ये एम. एस्सी. (कृषि), एम. टेक (कृषि अभियांत्रिकी), एम. एस्सी. (जैव तंत्रज्ञान) हे दोन वर्षाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच तीन वर्षाचा आचार्य पदवी अभ्यासक्रम राबविले जातात.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशासाठी सी.ई.टी. (सामाईक प्रवेश परीक्षा) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेमार्फत घेतली जाते.

**आचार्य अभ्यासक्रम:**

महाराष्ट्रातील चारही विद्यापीठामंध्ये आचार्य पदवी अभ्यासक्रम सुरू असुन सध्या कृषि शाखेंतर्गत एकुण १५ विषयांमध्ये आचार्य अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जात आहे. आचार्य अभ्यासक्रमाची प्रवेशासाठीची सी.ई.टी. (सामाईक प्रवेश परीक्षा) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेमार्फत घेतली जाते.

**सर्व कृषि पदवीधरांना पदवीनतंरच्या सामाईक संधी**

१. शासकीय नोक-यांमध्ये विविध विभागांत विविध पदांवर (वर्ग १ ते वर्ग ३)
२. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांमध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये
३. एम.एस्सी, पी.एच.डी. अशा उच्च शिक्षणांसाठी देशात व परदेशात शिक्षणात संधी
४. राज्य व केंद्रस्तरीय विविध प्रयोगशाळेमध्ये संशोधनांत नोकरीच्या संधी
५. संशोधन क्षेत्रात आवड असणा-यांसाठी राष्ट्रीय पातळीवर शिष्यवृत्तीसह शिक्षणाची व नोकरीच्या संधी
६. आंतरराष्ट्रीय बँका, राष्ट्रीय बँका, फायनान्स कंपनी मध्ये विकास अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, फायनान्स अधिकारी, प्रोबेशनरी या पदांवर काम करण्याची संधी
७. खाजगी कंपन्या उदा. बियाणे, किटकनाशके, खते, सिंचन सुविधा, प्रक्रिया इत्यादींमध्ये काम करण्याची संधी
८. आकाशवाणी, दुरदर्शन व कृषिपत्रकारीता, कृषि उद्योग, कृषि पणन, कृषि सल्ला इ.
९. कृषि विद्यापीठांत शिक्षण क्षेत्रात शिक्षक, संशोधक व विस्तार अधिकारी म्हणुन शासकीय व खाजगी महाविद्यालयांमध्ये नोकरीच्या संधी
१०. कृषि पुरक उद्योग उभारण्यात मोठा वाव
११. फार्मर प्रोड्युसर कंपनी तयार करणे

## कृषि पदवीधरांना पदवीनतंरच्या विषयनिहाय संधी

### बी. एस्सी. (कृषि) B. Sc. (Agri.)

१. माती व पाणी परिक्षण केंद्र स्थापन करून शेतक-यांना पिक पध्दती, निविष्ठा वापरण्यास सल्ला देणे
२. पिक संरक्षणासाठी औषध दुकाणे (उदा. किटकनाशके, तणनाशके, वृध्दी संप्रेरके इ.) सुरू करणे, सल्ला देणे , विक्री करणे
३. मधमाशी पालक, आळंबी उत्पादन, शेळी मेंढी पालन, दुग्ध व्यवसाय, पशुखाद्य विक्री, कुक्कुटपालन इत्यादी शेती पुरक उद्योग करणे

४. फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन करणे
५. पशुखाद्य निर्मिती, चारा पिके घेणे, विक्री करणे यामध्ये वाव
६. शेती क्षेत्रातील विविध अन्नधान्य, चारा व इतर बाबींची पौष्टीक मुल्य तपासून अहवाल तयार करण्याचा व्यवसाय
७. शेती क्षेत्रातील विविध प्रकारचे बीज उत्पादने घेऊन शेतक-यांना नविन बियाणे पुरविण्याचा व्यवसाय करणे
८. जीवआमृत, टायकोडरमा, ॲझोटोबॅक्टर, पीळस बी व इतर जैविक खतांची निर्मिती कारखाना उभारणे
९. शेती व्यवसायातील नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून इतर शेतक-यांना प्रात्यक्षिक दाखविण्याचा व्यवसाय
१०. हायड्रोप्रोणीक पध्दतीने भाजीपाला, चारापिके व इतर पिकांचे उत्पादन घेऊन व्यवसाय करणे
११. बियाणे प्रक्रिया करून साठवण ठेवणे व योग्य वेळी विक्री करणे

**बी. एस्सी. (उद्यानविद्या) B. Sc. (Horticulture)**

१. फळे, पुष्प, बीजोत्पादन यामध्ये काम करण्याची संधी
२. भाजीपाला, फळपिके यांचे संरक्षण करण्यासाठी औषधे दुकाणे सुरू करून सल्ला देणे, विक्री करणे
३. सुगंधी व औषधी वनस्पतींच्या रोपवाटीका तयार करून स्वयंरोजगार निर्माण करणे
४. फळप्रक्रिया उद्योग उभारून विविध उत्पादने तयार करणे, हवाबंद डब्यात भरणे, निर्यात करणे यांमध्ये मोठा वाव
५. फळ बागेचा आराखडा तयार करून फळ बाग स्थापिक करून देणे
६. रोप वाटिका, बगीचा, बीज उत्पादने यांचा सल्लागार म्हणुन काम करणे
७. नवनवीन शोभेची, औषधी, सुगंधी वनस्पतींच्या रोपांची निर्मिती करणे
८. व्हर्टीकल गार्डनिंगचा व्यवसाय करणे
९. लॉन्स व शोभीवंत झाडांची रोपवाटीकेचा व्यवसाय करणे
१०. माळी ट्रेनिंग/ कलम प्रकार ट्रेनिंग चा व्यवसाय करणे

**बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) B. Sc. (Agri. Engineering)**

१. कृषि यांत्रिकीकरण या क्षेत्रात उत्पादन, व्यापार तंत्रज्ञानामध्ये काम करण्याची संधी
२. शेतक-यांच्या मागणीनुसार कृषि अवजारे आणि यंत्रे भाडे तत्तवार देणे
३. ट्रक्टर, हार्वेस्टर, तुषार सिंचनच्या कंपन्यांमध्ये प्राध्यान्याने नोकरीची संधी
४. ड्रोननिर्मिती, ड्रोन वापर, रोबोटिक्स या नविन क्षेत्रात कृषि अभियंत्यांची मागणी मोठया प्रमाणावर आहे

५. शेती मालावर प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशनरी निर्माण करण्याची संधी उपलब्ध होते
६. शेती व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामुग्री निर्मिती कराखाना स्थापण्यास स्फुर्ती व चालना मिळते
७. शेडनेट, पॉलीहाऊस, ग्रीन हाऊस निर्मितीचा व्यवसाय करणे तसेच त्यासाठी लागणारे साहित्य निर्मितीचा व्यवसाय स्थापन करणे
८. मृद व जलसंधारण या क्षेत्रात बांधबदिस्ती, तलाव बांधणी ईत्यादींकरीता तज्ञ म्हणुन संबंधीत विभागात काम करण्याच्या संधी
९. जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी अंतर्गत विविध उपकरणे निमिर्ती क्षेत्रात वाव

**बी. टेक. (अन्नशास्त्र तंत्रज्ञान) B. Sc. (Food Science & Technology)**

१. अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, अन्न साठवण, अन्नवितरण, विक्री या क्षेत्रांत संधी
२. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवरील मोठया हॉटेल्समध्ये मॅनेजर, सल्लगार, तांत्रिक सहाय्यक यामध्ये काम करणे
३. फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया अंतर्गत तात्रिक सहाय्यक म्हणुन काम करणे
४. साखर कारखान्यांमध्ये क्वालीटी कंट्रोल या पदांवर मागणी
५. नवनवीन अन्न प्रक्रिया शोधुन त्यापासुन विविध प्रकारचे अन्नपदार्थ तयार करणे, पॅकींग करणे, विक्री यामध्ये संधी
६. जैविक इंधन प्रक्रिया मध्ये नवनविन प्रकारचे इंधनाचे स्त्रोत शोधने व इंधन निर्मिती या क्षेत्रात भविष्यात मोठा वाव आहे
७. कोल्ड स्टोरेज व प्रक्रिया, विक्री यामध्ये विविध कंपन्यात नोकरीच्या संधी

**बी. टेक. (जैव तंत्रज्ञान) B. Sc. (Bio Technology)**

१. ऊतीसंवर्धानाद्वारे विविध पिकांच्या नविन जाती तयार करणे, जैविक पद्धतीने किड नियंत्रण करणे यासाठी विविध कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी
२. जैवतंत्रज्ञान क्षेत्रात उच्च शिक्षणाच्या संधी व त्याद्वारे देश, परदेशात काम करण्याच्या संधी
३. जैविक शेती आणि निर्यातक्षम उत्पादनांसाठी किडनाकडे निर्मिती करणे
४. स्पीड ब्रिडींगद्वारे जलद पध्दतीने बिजोत्पादन
५. ऊतीसंवर्धन प्रयोगशाळा

**बी. एस्सी. (वनविद्या) B.Sc. (Forestry)**

१. शेळी, मेंढी पालन, दुग्ध उत्पादन व्यवसाय करणे
२. वनविभागांमध्ये केंद्र व राज्य सेवांमध्ये प्राधान्य
३. कागद, गोबरगॅस, काथ्या, कार्डबोर्ड, गोंद, रेशीम, लाख , औषधी वनस्पती, रबर, फर्निचर इत्यादी उद्योगांमध्ये प्राधान्य व स्वयंरोजगार निर्मिती

४. आयुर्वेदीक औषधी उत्पादन कंपन्यांमध्ये प्राधान्य
५. रेशिम उद्योग, कापड उद्योग या कंपन्यांमध्ये प्राधान्य

**बी. एस्सी. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) B.Sc. (Agril. Business Management)**

१. ग्रामीण भागात कृषि विस्तार व सल्ला केंद्र चालवता येऊन शेतक-यांना विक्रिबाबत सल्ला देणे
२. रोग व किडीविरहीत रोपे करण्यासाठी केळी, ऊस, डाळिंब इत्यादी रोपे, कलमे ऊतीसंवर्धनातुन तयार करणे
३. विविध इंन्शोरन्स कंपन्यांमध्ये सल्लागार म्हणुन काम करणे
४. फार्मर प्रोड्युसर कंपनी तयार करणे
५. एम.बी.ए. करून व्यापार क्षेत्रात काम करण्याची संधी

**बी. एस्सी. (मत्स्यविज्ञान) B.Sc. (Fishery)**

१. मासेमारी पद्धती, मासे प्रक्रिया साठवन, विक्रि, निर्यात क्षेत्रांत खुप संधी
२. पदवीनंतर एम. एस्सी. व पीएचडी (अॅक्वाकल्चर) शिक्षणाची संधी
३. केंद्रीय फिशरी विभाग, राज्य फिशरी विभाग यामध्ये नोकरीच्या संधी
४. बँकामध्ये कर्ज मंजुरी अधिकारी यापदावर नोकरीच्या संधी
५. मासळीपासून इतर विविध खाद्यापदार्थ तयार करणे, पॅकींग करणे, विक्री करणे, निर्यात करणे यामध्ये काम करण्याची संधी
६. मासेमारीसाठी विविध यंत्रसामुग्री तयार करणे, यंत्रे चालवणे
७. मास्यांच्या विविध प्रजाती शोधने, मत्स्यबिज तयार करणे, मासे खाद्याने विक्री, मास्यांपासून तेल निर्मिती करणे
८. मत्स्यव्यवसाय विभागांमध्ये शासन सेवेत नोकरीच्या संधी

**बी. एस्सी. (सामुदायिक विज्ञान) B.Sc. (Community Science)**

१. सदर पदवीनंतर विद्यार्थ्यांना पत्रकारीता, सामाजिक न्याय, भाषांतरकार, शिक्षण या क्षेत्रांत काम करण्याची संधी
२. विविध समाजसेवी संस्था (NGO) मध्ये काम करण्याच्या खुप संधी
३. समाज उद्धारासाठी शासनाच्या विविध योजनांमध्ये समन्वयक म्हणुन काम करण्याची संधी
४. समाज कल्याण खात्यांच्या योजनांमध्ये नोकरीच्या संधी
५. आकाशवाणी, दुरदर्शन यांमध्ये नोकरीच्या संधी

**कृषि शिक्षणासाठी  प्रवेश परीक्षा फॉर्म भरणे बाबत-२०२३**

**www.mahacet.org या संकेतस्थळाला भेट द्या**

**Homepage वर Download वर Click करा**

**यामध्ये Information Brochure वर Click  करून ते Download करा व Print काढुन पुन्हा पुन्हा वाचा**

**तसेच User Manual वर Click करा**

**User Manual मध्ये आपणांस फॉर्म भरण्याचा तपशिल (Application Process) दाखविला आहे. त्याप्रमाणे संपुर्ण फॉर्म भरा व कागदपत्रे अपलोड करा**

**फॉर्म भरतांना आपला नोंदनीकृत मोबाईल क्रमांक, ई-मेल ॲड्रेस आवश्यक आहे (OTP येण्यासाठी) (आपला फॉर्म क्रमांक व पासवर्ड लिहुन ठेवा)**

**तसेच खालील कागदपत्रे स्कॅन करून ठेवावेत**

**१. आधार कार्ड/ पॅन कार्ड (ओळख पुरावा करीता)**
**२. रहीवाशी दाखला / शाळा सोडल्याचा दाखला**
**३. जातीचा दाखला**
**४. जात पडताळणी दाखला**
**५. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र**
**६. उत्पन्नाचा दाखला (चालु आर्थिक वर्षाचा)**

(३ ते ५ : **जातीचे आरक्षणासाठी**)

**(पुढील पृष्ठावर पहा)**

७. शैक्षणिक प्रमाणपत्रे (SSC व HSC)
८. इतर आरक्षण घ्यायचे असल्यास त्यासाठी आवश्यक कागदपत्रे (उदा. दिव्यांग, प्रकल्पग्रस्थ, अनाथ इ.)
९. आयकार्ड साईज फोटो
१०. स्वाक्षरी
११. विहीत शुल्क

## कृषि विद्यापीठांत कृषि शिक्षण पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणेसाठी प्रक्रियाबाबत

**https://ug.agriadmision.in या संकेतस्थळाला क्लिक करा**

**प्रथमतः आपण प्रवेश माहितीपुस्तिका काळजीपुर्वक वाचल्यास आपल्याला प्रवेश प्रक्रियेची संपुर्ण माहिती मिळेल**

↓

**यामध्ये आपल्याला प्रवेश अर्ज भरता येईल**

↓

**आपला अर्ज भरतांना आवश्यक कागदपत्रांच्या प्रती आपला पासपोट फोटो, स्वाक्षरी आपलोड करावेत**

↓

**आपला अर्ज ऑनलाईन पद्धतीने सबमिट करावा व अर्जाची प्रत पाठवण्याची आवश्यक नाही**

↓

**खालील कागदपत्रे आवश्यकतेनुसार अपलोड करावीत**

१. १२ वीचे गुणपत्रक (टक्केवारीसह)
२. १० वीचे गुणपत्रक (टक्केवारीसह)
३. शाळा/ महाविद्यालय (१२ वी) सोडल्याचा दाखला
किंवा इतर ठिकाणी प्रवेशित असल्यास बोनाफाईड प्रमाणपत्र
४. महाराष्ट्राबाहेरीत उमदेवारांनी OS प्रमाणयत्र जोडावे
५. रहिवाशी दाखला
६. ७/१२ उतारा (मागिल किंवा चालु वर्षाचा)
उमेदवाराच्या आईचे वडिलांचे शेतजमिनीत वाटा असल्याबाबतचे रू. १००/- मुद्रांकावर आईच्या वडिलांचे प्रमाणपत्र व अधिकार अभिलेखे
किंवा भुमिहीन शेतमजुर असलेचा तहसिलदार यांचा दाखला किंवा मच्छीमार असलेचा दाखला

(अधिकार १२ गुण)

७. राखीव जागा (SC/ST/NT/OBC/SBC इ.) करीता जात पडताळणी प्रमाणपत्र
८. जातीचा दाखला
९. NT/OBC/SBC यांचेकरीता चालु वर्षात ३१ मार्च पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
१०. प्रकल्पग्रस्थ असल्यास जिल्हा पुर्नवसन अधिकारी किंवा त्यांचे प्राधीकृत अधिकारी यांनी दिलेला प्रकल्पग्रस्थ दाखला ज्यावर उमेदवाराचे नाव असावे
११. एन.सी.सी. प्रमाणपत्र (बी किंवा सी) (२%)

१२. जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे खेळाचे प्रमाणपत्र (नवोदय विद्यापीठ प्रकरणी जिल्हधिकारी जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे पत्र) (२%)
१३. मा. पंतप्रधान, भारत सरकार/ मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले स्वातंत्र्य सैनिकाचे प्रमाणपत्र
१४. राष्ट्रीय सेवा योजना प्रमाणपत्र (२%)
१५. उमेदवाराचे आई/ वडील कृषि विद्यापीठाचे आजी/ माजी/ मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख यांचा दाखला (३%)
१६. शारीरिक दृष्ट्या दिव्यांग प्रमाणपत्र (कमीतकमी ४० % दिव्यांगत्वाचे)
१७. अनाथ असल्याचे प्रमाणपत्र
१८. अल्पसंख्यांक असलेबाबात प्रमाणपत्र

वरिल योग्य ते अपलोड केलेले कागदपत्रे सुस्पष्ठ व वाचनिय असावीत.

सर्व दृष्टीने परीपुर्ण अंतिम दिनांकापुर्वी अपलोड केलेले अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरले जातील

अर्जदाराने प्राधान्यक्रम भरतांना (Option Form) जास्तीत जास्त विकल्प नोंदवावेत.

प्रथमतः प्रोव्हिजनल गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल व हरकतीनंतर अंतिम गुणवत्ता यादी संकेलस्थळावर प्रसिद्ध होईल.

गुणवत्ता व विकल्प, आरक्षण, उपलबध जागा यांवरून प्रवेश वाटप प्रक्रिया होईल.

प्रथमतः 'एम' कोटा (३० % राज्यस्तरीय) जागेंचा विचार होईल व त्यानंतर 'यु' कोटा (७० % विद्यापीठस्तरीय) जागेंचा विचार होईल व त्यानुसार दिनांकानुसार संकेतस्थळावर प्रवेश यादी प्रसिद्ध केली जाईल.

## प्रवेश कार्यपद्धती:

- सामायिक प्रवेश परीक्षा पर्सेंटाईल व इतर अधिकार विचारात घेऊन गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.
- प्रवेश माहिती पुस्तकात दिलेले वेळापत्रकानुसार प्रवेशाचे काजकाज चालेल व विद्यार्थ्यांना टपाल/ दुरध्वनीद्वारे गुणवत्ता व प्रवेशाबाबत व्यक्तीशः कळविले जाणार नाही.
- व्होकेशन कोर्सेस अधिकार १० % व कमाल अधिकार २० % पर्यंत राहीत उदा. ७५ % गुण व कमाल अधिकार २० % असेल तर एकुण ९५ % गुण तयार होतील.

## प्रवेश वाटप पद्धती:

प्रवेश वाटप झाल्यानंतर विद्यार्थ्यांना खालील विकल्प उपलब्ध असेल

१. फ्रीजः उमदेवार मिळालेली जागा स्विकारतील व नंतरच्या फेऱ्यात त्यांचे नाव राहणान नाही. प्रथम विकल्पाच्या जागेवर प्रवेश मिळाल्यास आपोआप फ्रीज समजले जाईल.
२. फ्लोटः उमदेवार मिळालेली जागा तात्पुरती स्विकारतील (जागा स्विकृती शुल्क रू. १०००/- भरून) आणि या विकल्पापेक्षा वरिल क्रमांकाचे महाविद्यालय मिळाल्याची वाट पाहतील. वरिल क्रमांकाचे

महाविद्यालय मिळाल्यास आधी मिळालेले महाविद्यालय निघुन जाईल. फ्लोट हा विकल्प केवळ दुसऱ्या फेरीसाठी जागा मिळणेस्तव उपलब्ध राहील. तिसऱ्या फेरीत जाण्यास सदर विकल्प उपलब्ध राहणार नाही.

फ्रीज करावयाच्या प्रकरणी विद्यार्थी प्रवेश वाटप पत्र प्रिंट काढुन प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात विहित मुदतीत जाऊन मुळ कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करतील.

<u>जागेवरील प्रवेश फेरी:</u>

केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेचे ठरलेले राऊंड संपलयानंतर रिक्त राहीलेल्या जागा भरण्यासाठी सदर फेरी राबविण्यात येईल.

जागेवरील प्रवेश प्रक्रिया कोणकोणत्या महाविद्यालयांत चालु आहे याची माहिती उमदेवारास प्रवेश माहिती पुस्तिकेतील परिशिष्ठ 'एच' मध्ये उपलब्ध असेल व परिशिष्ठ 'आय' मधील सुचनेनुसार सदर प्रवेश प्रक्रिया राबवण्यिात येईल.

संकेतस्थळावर या फेरीसाठी कोठे कोठे व किती जागा प्रवर्ग निहाय उपलब्ध आहेत हे दर्शविले जाईल.

आपल्याला ज्या केंद्रात प्रवेश प्रक्रियासाठी जायचे तेथे विद्यार्थ्यांने मुळ कागदत्रांसह व झेरॉक्ससह दिलेल्या वेळेत सकाळी १०.०० पुर्वी हजर राहुन नोंद करावी.

त्या दिवसा ाच्या हजर विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी दुपार पर्यंत प्रकाशित होऊन गुणवत्तेनुसार व जागा उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार प्रवेश दिला जाईल.

वेळापत्रकात दिलेल्या दिनांकास संबंधित महाविद्यालयास संपर्क साधुन विहीत शुल्क जमा करून प्रवेश निश्चित केला जाईल.

तसेच वर्ग सुरू होणाऱ्या दिनांकापासुन महाविद्यालयात शिक्षणासाठी हजर रहावे लागेल.

संपर्क: १) डॉ. रवि आंधळे, तांत्रिक अधिकारी
मो. ९४२२७७९४६७
२) श्री. एकनाथ बांगर, सहाय्यक कुलसचिव
मो. ९४०४९५७२३३
अधिष्ठाता कार्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
फोन नं: ०२४२६-२४३२०६